# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Ph.No : (0721) 2573027, 2572577
Website: www.jdroamt.org Email: roamravati@dtemaharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२२/ 2698
दिनांक :- 10 OCT 2022

प्रति,

प्राचार्य,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०२२/३३७ दिनांक ७ ऑक्टोंबर २०२२.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२२/२५३५ दिनांक २३ सप्टेंबर २०२२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती दिनांक २३/९/२०२२ पर्यंत पडताळणी करुन अद्ययावत करण्याबाबत आपणास कळविलेले होते. परंतु काही संस्थांनी दिलेल्या दिनांकापर्यंत सदर माहीती अद्ययावत केलेली नाही. तथापी मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी संदर्भ १ अन्वये एक शेवटची संधी म्हणून **दिनांक १७/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** सदर माहीती अद्ययावत करण्याबाबत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थाची माहीती अद्ययावत करण्याचे दृष्टीने पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता सबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार सबंधित विद्यापिठाकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहीती फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे लगतचे मान्यता तसेच पदवीका संस्थांनी सबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे सलग्नता प्रदान केल्याचे प्रमाणपत्र फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे लगतचे मान्यता पत्र सादर करुन सदर माहीती **दिनांक १७/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** अद्ययावत करुन घ्यावी. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत माहीती अद्ययावत केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या औषधनिर्माणशास्त्र पदवीका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था यांनी या अगोदर सदर माहीती अद्ययावत केलेली आहे. परंतु लगतच्या काळामध्ये फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी प्रवेशक्षमतेमध्ये वाढ किंवा घट केलेली आहे अश्या संस्थांनी फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे लगतच्या काळामध्ये प्राप्त झालेले मान्यता पत्र

सादर करुन आवश्यक ते बदल करुन घ्यावे. सदर माहीती अद्ययावत करतांना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घ्यावी. मंजुर प्रवेश क्षमतेची माहीती ही प्रवेश प्रक्रिये दरम्याण जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहीतीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी सबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहीती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणा-या परिणामास सबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, याची सुध्दा गांभिर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.